
# ६) इणसुत्त

**प्रस्तावना**

प्रस्तुत पद्यपाठ पालि तिपिटकाच्या अङ्गुत्तरनिकायातील 'छकनिपातो' यातुन घेतला आहे. यामध्ये कर्जाच्या दुष्परिणामाचे वर्णन केले आहे. एखादी व्यक्ती आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच आपली दारिद्र्यता नष्ट करण्यासाठी दुसऱ्यांकडून कर्ज घेते. त्या घेतलेल्या कर्जाचे त्यास व्याज भरावे लागते. कर्जाच्या रकमेची परतफेड वेळेवर न केल्यास कर्ज देणाऱ्याकडून मानहानी, अपमान, कारागृहात रवानगी, दंड इत्यादी भोगावे लागते. त्यामुळे समाजात आपली प्रतिमा मलिन होते. आपला दोष लपविण्यासाठी काया, वाचा व मनाने दुष्कृत्य घडते. म्हणून व्यक्तीने आपल्या गरजांवर नियंत्रण ठेवून कर्ज न काढता आपला जीवनव्यवहार करावा. अर्थात 'अंथरूण पाहून पाय पसरावे' या म्हणीप्रमाणे जीवन जगावे हा संदेश या पाठात दिलेला आहे.

" **कर्जाचे दुष्परिणाम जाणून काया, वाचा व मनावर संयम ठेवून जीवनयापन करणे.**"



दालिद्दियं दुक्खं लोके, इणादानं च वुच्चति।
दलिद्दो इणमादाय, भुञ्जमानो विहञ्ञति।।१।।

ततो अनुचरन्ति नं, बन्धनम्पि निगच्छति।
एतञ्हि बन्धनं दुक्खं, कामलाभाभिजप्पिनं।।२।।

तथेव अरियविनये, सद्धा यस्स न विज्जति।
अहिरीको अनोत्तप्पी, पापकम्मविनिब्बयो।।३।।


कायदुच्चरितं कत्वा, वचीदुच्चरितानि च।
मनोदुच्चरितं कत्वा, मा मं जञ्ञू' ति इच्छति।।४।।

सो संसप्पति कायेन, वाचाय उद चेतसा।
पापकम्मं पवड्ढेन्तो, तत्थ तत्थ पुनप्पुनं।।५।।

सो पापकम्मो दुम्मेधो, जानं दुक्कटमत्तनो।
दलिद्दो इणमादाय, भुञ्जमानो विहञ्ञति।।६।।

ततो अनुचरन्ति नं, सङ्कप्पा मानसा दुक्खा।
गामे वा यदि वारञ्ञे, यस्स विप्पटिसारजा।।७।।

सो पापकम्मो दुम्मेधो, जानं दुक्कटमत्तनो।
योनिमञ्ञतरं गन्त्वा, निरये वापि बज्झति।।८।।



एतञ्हि बन्धनं दुक्खं, यम्हा धीरो पमुच्चति।
धम्मलद्धेहि भोगेहि, ददं चित्तं पसादयं।।९।।

उभयत्थ कटग्गाहो, सद्धस्स घरमेसिनो।
दिट्ठधम्महितत्थाय, सम्परायसुखाय च।
एवमेतं गहट्ठानं, चागो पुञ्ञं पवड्ढति।।१०।।

तथेव अरियविनये, सद्धा यस्स पतिट्ठिता।
हिरीमनो च ओत्तप्पी, पञ्ञवा सीलसंवुतो।।११।।

एसो खो अरियविनये, सुखजीवी ति वुच्चति।
निरामिसं सुखं लद्धा, उपेक्खं अधितिट्ठति।।१२।।

**(संदर्भ– अङ्गुत्तरनिकाय छकनिपातो)**

## शब्दार्थ

**इणं (नपु.)**– कर्ज
**इणादानं (नपु.)**– कर्ज देणे
**दालिद्दियं (वि.)**– दारिद्र्यता
**लोके (पु.)**– लोकात, जगात
**वुच्चति (वर्त.क्रि.)** – म्हणतो
**भुञ्जमानो (वि.)**– भोगणारा
**विहञ्ञति (वर्त.क्रि.)**– प्राप्त होतो
**अरियविनये (वि.)**– बुध्दशासनात
**सद्धा (नपुं)**– श्रद्धा
**अनोत्तप्पी(नपुं.)**– निर्भय
**कामलाभ (पु.)**– कामोपभोगाची प्राप्ती
**अहिरीको (वि.)**– लज्जारहित, संकोचरहित
**काया (स्त्री.)**– शरीर
**वाचा(स्त्री)** – वाणी
**मनो (नपुं)**– मन (चित्त)
**दुच्चरितं (नपु.)**– वाईट आचरण
**मा (आज्ञार्थ)**– नको, नका
**जञ्ञु (वि.)**– अन्य, कुलीन
**इच्छति (वर्त.क्रि.)**– इच्छा करतो
**पापकम्मं (वि.)**– पापकर्म
**दुम्मेध (वि.)**– वाईट बुद्धीचा
**दुक्कट (वि.)**– वाईट कृत्य
**सङ्कप्प (पु.)**– संकल्प
**योनिमञ्ञत्तरं (नपु.)**– मृत्यूनंतर
**धीरो (पु.)**– बुद्धिमान
**पमुच्चति(वर्त.क्रि.)**– मुक्त होतो
**लद्ध (कृदन्त)**– प्राप्त
**गहट्ठ (पु.)**– गृहस्थ
**चागो (नपु.)**– त्याग
**पुञ्ञं (नपु.)**– पुण्य
**पवड्ढति (वर्त.क्रि.)**– वाढते, वाढतो
**पञ्ञवा (वि.)**– प्रज्ञावान
**सीलसंवुतो (वि.)**– सदाचारी
**सुखजीवी (वि.)**– सुखी जीवन जगणारा
**उपेक्खा (स्त्री.)**– उपेक्षा
**निरामिस (नपु.)**– निरपेक्ष
**अधितिट्ठति (वर्त.क्रि.)**– (ध्यानात) स्थिर होतो

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) या जगात दुक्ख कशाला म्हणतात?
२) कर्जाची परतफेड न केल्याने कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते?
३) पापकर्म कोण करतो?
४) कोणत्या तीन गोष्टी दुसऱ्यांनी जाणू नये असे आपणास वाटते.
५) सुखाची इच्छा असणाऱ्यास कोणत्या कारणांनी दुक्खातच मरण येते?
६) तथागताप्रती श्रध्दा प्रकट केल्यास कशापासून मुक्ती मिळते?
७) घरातील त्याग आणि पूण्य कसे वाढते?
८) सुखजीवी कोणास म्हणावे?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) तथेव अरियविनये सध्दा यस्स न विज्जति।
२) मनोदुच्चरितं कत्वा, ''मा मं जञ्ञू' ति न इच्छति।
३) गामे वा यदि वारञ्ञे यस्स विप्पटिसारजा।
४) धम्मलद्धेहि भोगेहि इदं चित्तं न पसादयं।
५) एसो खो अरियविनय 'सुखजीवी ति वुच्चति।

### ३. रिकाम्या जागा भरा.

१) दलिद्दो इणमादाय भुञ्जमानो................। (विहञ्ञति/जहन्ति)
२) मनोदुच्चरितं कत्वा. मा ................जञ्ञू ति इच्छति। (त्वं/मं)
३) सो................ दुम्मेधो, जानं दुक्कटमत्तनो। (पुञ्ञकम्मो/पापकम्मो)

### ४. सुचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.

१) विज्जति ( काळ ओळखा)

२) कत्वा (अव्यय ओळखा)

३) सद्धा (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

४) सो (विरुध्दार्थी शब्द लिहा)

### ५. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) एतञ्हि बन्धनं दुक्खं | अ) बन्धनम्पि निगच्छति। |
| २) ततो अनुचरन्ति नं | ब) कामलाभाभिजप्पिनं। |
| ३) निरामिसं सुख लद्धा | क) चागो पुञ्ञ पवड्ढति। |
| | ड) उपेक्खं अधितिट्ठति। |

### ६. संधी करा.

१) इणं + आदाय


२) तथ + एव

३) एवं + एत


४) वा + अपि

### ७. जाळरेखाचित्र पूर्ण करा.


१)




२)




३)




### ८. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.

कर्ज काढण्याचे दुष्परिणाम कोणते ते सांगा.

☆☆☆